2 DEC 2023

पुढारी

[illegible]संपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को[illegible]

# युवा पिढीच नवभारत घडविण्यासाठी योगदान देईल

## गोवा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत; विद्यापीठात 'आत्मनिर्भर भारत आणि युवकांचे योगदान' वर विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुढील २५ वर्षांत सर्वच क्षेत्रांत भरीव योगदान देऊन युवा पिढीच नवा भारत घडवेल. त्या दृष्टीने आत्मनिर्भर भारत संकल्पना ऊर्जास्रोत म्हणून काम करेल, असा विश्वास गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'आत्मनिर्भर भारत आणि युवकांचे योगदान' या विषयावर विशेष व्याख्यानात ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले, २०२० रोजी 'स्वयंपूर्ण गोवा' योजनेचे उद्घाटन केले. प्रत्येक कुटुंबास वीज, पाणी, शौचालय आदी सुविधांची उपलब्धता करून दिली. विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचविल्या. अंत्योदय तत्त्वावर राबविलेल्या योजनांमुळे राज्य दूध, दुग्धजन्य पदार्थ, फलोत्पादन, फुलोत्पादन या



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. समोर उपस्थित प्राध्यापक, विद्यार्थी.**

क्षेत्रांत स्वयंपूर्ण तर झाले. अन्य राज्यांतही निर्यात करू लागले.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पाटील म्हणाले, गोवा ४५० गावांचे राज्य असल्याचे तेथे योजना राबविणे सोपे आहे. महाराष्ट्रासारख्या हजारो खेडी राज्यात योजना खालपर्यंत झिरपत नेणे जिकीरीचे आहे. जलयुक्त शिवार, ३३ कोटी वृक्षलागवड, शेतकरी विमा योजना, स्टँड अप इंडिया, स्टार्टअप इंडिया योजनांचा सकारात्मक परिणाम दिसला आहे. संरक्षणविषयक संशोधन व उत्पादन निर्मितीला प्रोत्साहन दिल्याने १५ हजार कोटींची निर्यात करू शकलो. इथॅनॉल निर्मिती व २० टक्के इंधनात मिसळल्यामुळे २०३० पर्यंत देशाला एक थेंबही कच्चे तेल आयात करण्याची गरज भासणार नाही.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, गोव्यात आत्मनिर्भर भारत योजना राबविल्यानेच पर्यटनापलीकडे गोवा राज्याच्या स्वयंपूर्णतिचा आदर्श देशभरात निर्माण होऊ शकला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार आदी उपस्थित होते.

### समूह विद्यापीठांच्या स्थापनेकडे वाढता कल

नव्या शैक्षणिक धोरणामुळे स्थानिक उद्योग-व्यवसायांच्या गरजेनुरूप शिक्षण व संशोधनाला प्रोत्साहन मिळत आहे. सध्या राज्यातील २०० महाविद्यालये व ४२ विद्यापीठे स्वायत्त आहेत. समूह विद्यापीठांच्या स्थापनेकडे कल वाढत आहे. मातृभाषेतून शिक्षणामुळे घोकंपट्टीच्या पलीकडे विषयाचे आकलन विद्यार्थ्यांना होऊ लागले आहे. या साऱ्या बाबी देशाच्या आत्मनिर्भरतेला चालना देणाऱ्या ठरत आहेत.

### शिवाजी विद्यापीठात उलगडले 'स्वयंपूर्ण गोव्या'चे गमक

कौशल्य विकास योजनेद्वारे युवकांना स्किलींग-रिस्किलींग-अपस्किलींग पद्धतीने कौशल्य प्रशिक्षण दिले. दहावी ते पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा ८ ते १५ हजार रुपयांचे मानधन देण्याची व्यवस्था केली. गावांमधून विविध प्रकारची उत्पादने वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी ई-बाझार पोर्टल निर्माण केले. 'हॅलो गोंयकार'कार्यक्रमाद्वारे नागरिकांशी थेट संवाद साधला. गोव्याच्या उपक्रमांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये प्रशंसा केली. सामाजिक सुरक्षा, समाधानाचा निर्देशांक, पायाभूत सुविधा विकास, पर्यावरण संवर्धन या सर्वच निकषांवर गोवा देशात अव्वल कामगिरी करीत आहे.

2 DEC 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा पिढीच घडवेल नवा भारत

## डॉ. प्रमोद सावंत : 'आत्मनिर्भर भारत' संकल्पना ऊर्जास्रोत म्हणून काम करेल

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : 'आगामी २५ वर्षांत सर्वच क्षेत्रांत भरीव योगदान देऊन युवा पिढीच नवा भारत घडवेल. त्यादृष्टीने आत्मनिर्भर भारत ही संकल्पना ऊर्जास्रोत म्हणून काम करेल,' असा विश्वास गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात आज मुख्यमंत्री डॉ. सावंत यांचे 'आत्मनिर्भर भारत आणि युवकांचे योगदान' यावर व्याख्यान झाले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. सावंत म्हणाले, 'आत्मनिर्भर भारत योजनेने सर्व घटकांना प्रेरणा देण्याचे काम केले. गोवा हे कृषी व कृषीपूरक उत्पादने आदींसह अनेक



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'आत्मनिर्भर भारत आणि युवकांचे योगदान' यावरील विशेष व्याख्यानात बोलताना गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत.**

बाबतीत परावलंबी होते. त्यानुसार सर्वप्रथम राज्यातील साधनसंपत्तीच्या उपलब्धतेची तसेच आयात-निर्यातीची, सामाजिक-आर्थिक परिस्थितीची ताजी माहिती संकलित केली. ही माहिती घेतल्यानंतरच दोन ऑक्टोबर २०२० रोजी 'स्वयंपूर्ण गोवा' योजनेचे उद्घाटन केले. राज्यातील प्रत्येक कुटुंबाला वीज, पाणी, शौचालय आदीसह दिव्यांगांसह सर्व नागरिकांना सामाजिक सुरक्षा, आरोग्यसुविधा, कृषीसंपदा संवर्धनासाठी साधनसुविधांवर काम करण्यास सुरवात केली. त्यासाठी 'स्वयंपूर्ण मित्र' ही संकल्पना राबविली. कार्यानुभव आणि रोजगाराची संधीच्या माध्यमातून दहावी ते पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा आठ हजार ते पंधरा हजार रुपयांदरम्यान काही ना काही मानधन मिळत राहील, याची व्यवस्था केली.'

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, ' महाराष्ट्र राज्यात राबविलेल्या जलयुक्त शिवार, ३३ कोटी वृक्षलागवड, शेतकरी विमा योजना, स्टँड अप इंडिया, स्टार्टअप इंडिया आदी योजनांनी निश्चितपणे सकारात्मक परिणाम दर्शविला आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार आदी उपस्थित होते.

### संशोधनाचा प्रवास...

■ मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, 'नवसंशोधन, पेटंट आणि रॉयल्टी असा संशोधनाचा प्रवास व्हावा, जेणेकरून देशांतर्गत दर्जेदार उत्पादने निर्माण होतील. सध्या महाराष्ट्रातील २०० महाविद्यालये आणि ४२ विद्यापीठे स्वायत्त आहेत. समूह विद्यापीठांच्या स्थापनेकडेही कल वाढतो आहे. मातृभाषेतून शिक्षणामुळे घोकंपट्टीच्या पलिकडे विषयाचे आकलन विद्यार्थ्यांना होऊ लागले आहे.'

- 2 DEC 2023 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा पिढीच नवा भारत घडवेल - डॉ. प्रमोद सावंत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** आगामी २५ वर्षांत सर्वच क्षेत्रांत भरीव योगदान देऊन युवा पिढीच नवा भारत घडवेल. त्या दृष्टीने आत्मनिर्भर भारत ही संकल्पना ऊर्जास्त्रोत म्हणून काम करेल, असा विश्वास गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात 'आत्मनिर्भर भारत आणि युवकांचे योगदान' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते.

गोव्याचे मुख्यमंत्री या नात्याने 'आत्मनिर्भर योजने'च्या अनुषंगाने 'स्वयंपूर्ण गोवा' ही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी केलेल्या परिश्रमांची माहिती डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली. ते म्हणाले, की त्यानुसार सर्वप्रथम राज्यातील



शिवाजी विद्यापीठात व्याख्यानप्रसंगी बोलताना गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत.

साधनसंपत्तीच्या उपलब्धतेची, तसेच आयात-निर्यातीची, सामाजिक-आर्थिक परिस्थितीची ताजी माहिती संकलित केली. त्यानंतर २ ऑक्टोबर २०२० रोजी 'स्वयंपूर्ण गोवा' योजना सुरू केल्याने आमूलाग्र बदल घडला आहे.

### निर्यातक्षम राज्य

राज्यातील प्रत्येक कुटुंबाला वीज, पाणी, शौचालय आदी सुविधांची उपलब्धता करण्याबरोबरच दिव्यांगांसह सर्व नागरिकांना सामाजिक सुरक्षा, आरोग्यसुविधा, कृषिसंपदा संवर्धनासाठी साधनसुविधा अशा बाबींवर काम करण्यास सुरुवात केली. त्यासाठी 'स्वयंपूर्ण मित्र' ही संकल्पना राबविली. या योजनांमुळे राज्य दूध, दुग्धजन्य पदार्थ, फलोत्पादन, फुलोत्पादन या क्षेत्रांत स्वयंपूर्ण तर झालेच, पण अन्य राज्यांतही निर्यात करू लागले. या योजना राबवीत असताना शाश्वत विकासाचे लक्ष्य साध्य करण्याकडेही लक्ष पुरविण्यात आले. एकूणच सुशासन, आर्थिक वृद्धी, वित्तीय समावेशन, सामाजिक सुरक्षा, समाधानाचा निर्देशांक, पायाभूत सुविधा विकास आणि पर्यावरण संवर्धन या सर्वच निकषांवर गोवा राज्य देशात अव्वल कामगिरी करीत आहे, असे त्यांनी सांगितले.

2 DEC 2023
जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात साकारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल

## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते भूमिपूजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या कुस्ती संकुल इमारतीचे भूमिपूजन व कोनशिला अनावरण गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी संकुलाचा आराखडा पाहून समाधान व्यक्त केले. संकुल उभारणीसाठी शुभेच्छा दिल्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठातील क्रीडा अधिविभागाजवळील एन.सी.सी. भवनच्या मागील बाजूस आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्ती संकुलाची भव्य इमारत उभी राहणार आहे. पहिल्या टप्प्यात इमारतीचे ८७७.८५ चौरस मीटर क्षेत्रफळाचे बांधकाम होणार आहे. संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दोन मॅट बसविण्यात येणार आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कुस्ती संकुलाचे भूमीपूजन करताना गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे आदी.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. गिरीश कुलकर्णी उपस्थित होते.

02 DEC 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल

## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते भूमीपूजन

■ उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या कुस्ती संकुल इमारतीचे भूमीपूजन शुक्रवारी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांच्या हस्ते आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाजवळील एन.सी.सी. भवनच्या मागील बाजूस आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्ती संकुलाची भव्य इमारत उभी राहणार आहे. पहिल्या टप्प्यात या इमारतीचे ८७७.८५ चौरस मीटर इतक्या क्षेत्रफळाचे बांधकाम करण्यात



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुस्ती संकुलाच्या कोनशिलेचे अनावरण करताना गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मान्यवर.

येणार आहे. या संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन मॅट बसविण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी संकुलाचा आराखडा पाहून समाधान व्यक्त केले, तसेच संकुल उभारणीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.प्रकाश गायकवाड, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ.गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, डॉ. वैभव ढेरे यांच्यासह व्यवस्थापन परिषद, अधिसभा, विद्या परिषद आदी विविध अधिकार मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 DEC 2023

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात साकारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल



## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते भूमिपूजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या कुस्ती संकुल इमारतीचे भूमिपूजन शुक्रवारी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते आणि महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाजवळील एन.सी.सी. भवनच्या मागील बाजूस आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्ती संकुलाची भव्य इमारत उभी राहणार आहे. पहिल्या टप्प्यात या इमारतीचे ८७७.८५ चौरस मीटर इतक्या क्षेत्रफळाचे बांधकाम करण्यात येणार आहे. या संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन मॅट बसविण्यात येणार आहेत. या संकुलाचे भूमीपूजन व कोनशिला अनावरण मुख्यमंत्री डॉ. सावंत आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी संकुलाचा आराखडा पाहून समाधान व्यक्त केले, तसेच संकुल उभारणीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजीत यादव, डॉ. वैभव ढेरे यांच्यासह व्यवस्थापन परिषद, अधिसभा, विद्या परिषद आदी विविध अधिकार मंडळाचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

2 DEC 2022
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुस्ती संकुलाचे विद्यापीठात भूमिपूजन

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठात उभारण्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या येणाऱ्या कुस्ती संकुल इमारतीचे भूमिपूजन आज गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते झाले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुस्ती संकुलाचे शुक्रवारी भूमिपूजन करताना गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. शेजारी चंद्रकांत पाटील, डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे आदी.

विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाजवळील एन.सी.सी. भवनच्या मागील बाजूस संकुलाची भव्य इमारत साकारणार आहे. पहिल्या टप्प्यात इमारतीचे ८७७.८५ चौरस मीटरचे बांधकाम करण्यात येणार आहे. संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन मॅट बसविण्यात येतील. मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी संकुलाचा आराखडा पाहून समाधान व्यक्त केले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, डॉ. वैभव ढेरे यांच्यासह विविध विभागांच्या अधिकार मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

- 2 DEC 2023

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देणाऱ्या कुस्ती संकुलाचे उद्‌घाटन

## शिवाजी विद्यापीठ : गोव्याच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या कुस्ती संकुल इमारतीचे भूमिपूजन गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ झाला.

विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाजवळील एनसीसी भवनच्या मागील बाजूस आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्ती संकुलाची भव्य इमारत उभी राहणार आहे. पहिल्या टप्प्यात या इमारतीचे ८७७.८५ चौरस मीटर इतक्या क्षेत्रफळाचे बांधकाम करण्यात येणार आहे. या संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन मॅट बसविण्यात येणार आहेत. या संकुलाचे भूमिपूजन व कोनशिला अनावरण मुख्यमंत्री डॉ. सावंत व मंत्री पाटील यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.



विद्यापीठाच्या कुस्ती संकुलाचे भूमिपूजन गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

2 DEC 2022
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजाराम महाराजांचे चरित्र प्रकाशित करावे

## कुलसचिव शिंदे : राजाराम महाविद्यालयात पुण्यतिथी कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : छत्रपती राजाराम महाराजांचे चरित्र लवकरात लवकर प्रकाशित करण्याची गरज शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केली.

राजाराम महाविद्यालय येथे गुरुवारी छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. शिंदे बोलत होते. प्राचार्या डॉ. वाय. सी. आत्तार अध्यक्षस्थानी होत्या. बाळ पाटणकर, त्यांचे चिरंजीव सिध्दार्थ व नकुल पाटणकर उपस्थित होते.

इंग्रजी विभागप्रमुख डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी छत्रपती राजाराम महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून त्यांची शिक्षणाबद्दलची तळमळ आणि दूरदृष्टी अधोरेखित केली. छत्रपती राजाराम महाराजांना दुर्दैवाने अतिशय अल्प आयुष्य लाभले. त्यांचा मृत्यू युरोपच्या अभ्यास दौऱ्यावर असताना ३० नोव्हेंबर १८७० रोजी इटलीतील फ्लॉरेन्स येथे वयाच्या विसाव्या वर्षी झाला. युरोपला अभ्यास दौऱ्यावर जाण्यापूर्वी कोल्हापुरात पहिल्या इंग्रजी शाळेच्या इमारतीची पायाभरणी राजाराम महाराजांनी केली होती. छत्रपती राजाराम महाराजांचे यथोचित स्मारक राजाराम महाविद्यालयात उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे बाळ पाटणकर यांनी वचन दिले. डॉ. संजय पाठारे यांनी आभार मानले. डॉ. धनंजय देवळालकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठात व्यक्तीमत्व विकासवर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग व आजीवन शिक्षण आणि विस्तार अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भावी शिक्षकांसाठी एक दिवसीय 'व्यक्तिमत्त्व विकास आणि संप्रेषण कौशल्य' या विषयावर कार्यशाळा झाली. उद्‌घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यांनी व्यक्तिमत्त्व विकासावर मार्गदर्शन केले.

डॉ. बी एम हिर्डेकर, डॉ. तृप्ती करीकट्टी, डॉ. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले. शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर व आजीवन शिक्षण आणि विस्तार अधिविभागचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार यांनी कार्यक्रमाचा हेतू सांगितला. यावेळी समन्वयक डॉ. आर. यु. संकपाळ, वाय. एस. बोकील, डॉ. एन. एस. माळी आदी उपस्थित होते.

02 DEC 2023 पुढारी / जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स. ब. खाडे, महावीर कॉलेज उपांत्य फेरीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी

कोपार्डे येथील स. ब. खाडे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धेत स. ब. खाडे महाविद्यालय, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द, देवचंद कॉलेज व महावीर कॉलेज संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीतील पहिला सामना खाडे कॉलेज विरुद्ध देवचंद कॉलेज, तर दुसरा सामना वारणा महविद्यालय विरुद्ध महावीर कॉलेज यांच्यात होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन आमदार प्रा. जयंत आसगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवरील नियोजित खेळाडू वसतिगृह बांधकामास निधी शासनस्तरावर प्राप्त करून देण्याचे आश्वासन आ. आसगावकर यांनी दिले. यावेळी ज्येष्ठ हॉकी संघटक विजय साळोखे-सरदार, प्राचार्य डॉ. सुहास राऊत, केशवराव जाधव, डॉ. विकास जाधव, डॉ. रणजित इंगवले, प्रा. सुहास वाघ आदी उपस्थित होते. संयोजन प्रा. डॉ. अभिजित वणिरे, प्रा. प्रसाद गुळवणी, प्रा. निशांत गोंधळी, सागर जाधव, योगेश देशपांडे यांनी केले.